'अंनिस' वाल्यांचा खरा चेहरा (आवृत्ती 2)


अर्थात विज्ञान आणि अंधश्रद्धा निर्मूलन (आवृत्ती 1)

अर्पण पत्रिका - भूमिका - अनुक्रमणिका

मृखपृष्ठावरील चित्र चीनमध्ये हजारो युवक प्रतिवर्षी करीत अस
दिव्यातील एक दृश्य, विस्तवावरून चालण्याचे व पापण्या, ओठ,
जीभ, गळ्याचे कातडे यातून धारदार पाती, सळ्या इ. खुपसून घे
प्रकार या उत्सवात हजारो युवक करतात. हा उत्सव पाहण्यास अ
लोकात यावर्षी अक्षरशः चेंगराचेंगरी झाली. अनेकजण जखमी झ


(विश्वसंचार पुढारी, ऑक्टोबर १७, १९८९)   प्रकाशन गीता जयंती, ७ डिसेंबर २०००

आवृत्ती प्रथम   सन २०००



- **विज्ञान आणि अंधश्रद्धानिर्मूलन**
- अद्वयानंद गळतगे
- प्रकाशक सौ. संगीता वेदांत गळतगे, (बेळगाव), कर्नाटक- ५९१२६३
- अक्षरजुळणी व मांडणी चारुलता पाटील, अक्षरमुद्रा पेजमेकर्स, पांडुरंग अपार्टमेंट, सम्राटनगर, कोल्हापूर
- © अद्वयानंद गळतगे भोज (बेळगाव), कर्नाटक- ५९१२६३


मुजक ओमेगा ऑफसेट प्रिंटर, ४५७४, शेटटी गल्ली बेळगाव (कर्नाटक) रु.८०



आवृत्ती द्वितीय सन २०१२

नाडी भविष्य वर्तवून बुद्धिवाद ही सर्वात मोठी अंधश्रद्धा असल्याचे सिद्ध करणाऱ्या भारतीय सिद्धयोग्यांना हा ग्रंथ सादर समर्पण








प्राचार्य अद्वयानंद गळतगे सरांनी माझ्या समावेत आपले अगस्त्य नाडी भविष्य तांबरमच्या केंद्रात 1998 पाहिले. नंतर पुण्यात अत्री जीव नाडीचा अनुभव घेतला होता. सरांच्या पट्टीत माझे नाव कसे कोरून लिहिले होते, तो फोटो कालांतराने गाजला आहे.

सरांच्या ‘विज्ञान आणि चमत्कार’ ग्रंथात त्यांनी नाडी महर्षींच्या ग्रंथनिर्मितीला वंदन करून हे पुस्तक त्यांना समर्पित केले आहे.



नाडीपट्टीत व्यक्तींची नावे कोरलेली असतात ?

नाडी भविष्य पाहताना तामिळ न जाणणाऱ्या लोकांना खरेच नाडी पट्ट्यात व्यक्तींची नावे व अन्य माहिती खरोखरच कोरून लिहिलेली असते का? असा प्रश्न पडतो. त्याचे उत्तर 'होय' असे आहे. त्याचा एक नमूना सोबतच्या फोटोतील वेगवेगळ्या केंद्रात, ४ वर्षाच्या फरकाने मिळालेल्या दोन पट्ट्यात लेखक 'शशिकांत' यांचे हे नाव कोरल्याचा प्रत्यक्ष पुरावा!

शेजारच्या फोटोत शशिकांत नाव दोन वेगवेगळ्या पट्ट्यात कसे आले आहे ते दर्शवले आहे. पैकी वरील सरांची पट्टी ९८साली व खालील पत्नीच्या ताडपट्टीला १९९४ साली शोधण्यात आले होते.



कर्नाटक राज्यात निपाणी या सीमावर्ती गावापासून २० किमी दूर भोज खेड्यात सरांची शेती आहे त्या ठिकाणी सरांचा बंगला आहे. त्यांना भेटायला २०१६साली गेलो असतानाचे सरांसमावेत फोटो.

भूमिका

मोरा अंगी असोसे। पिसे असती डोळसे । परि एकली दृष्टि नसे । तैसे ते गा ।।

- ज्ञाने. १३.८३५

अर्थ :- मोराच्या अंगावर डोळ्यासारखी पुष्कळ पिसे असतात. पण त्यांचा पाहण्यासाठी काहीच उपयोग नसतो. त्याप्रमाणे एकटी (अध्यात्मज्ञानाची दृष्टी नसेल तर इतर (पुष्कळ शास्त्रांच्या ज्ञानाची) दृष्टी असून काय उपयोग? (ते लोक आंधळेच असतात.)

एकदा एका प्रवाशाने एका राजाला सारख्याच दिसणाऱ्या व सारख्याच आकाराच्या तीन बालकांच्या मूर्ती भेट म्हणून दिल्या. राजाला त्या मूर्तींचा अर्थ कळेना. म्हणून त्याने आपल्या राज्यातील शहाण्या लोकांची एक सभा बोलाविली व त्यांच्यापुढे त्या मूर्ती ठेवून 'या तीन बालकांचे रहस्य कोण उलगडून दाखवील काय?' असा त्यांना प्रश्न केला. पण कुणालाही त्या मूर्तींचे रहस्य उलगडता येईना. शेवटी एक वृद्ध गृहस्थ पुढे आला. त्याने राजाकडून एक लवचिक तार मागवून घेतली व ती पहिल्या बालकाच्या कानात घातली. ती त्या बालकाच्या दुसऱ्या कानातून बाहेर आली. नंतर दुसऱ्या बालकाच्या कानात घातली. ती त्याच्या तोंडातून बाहेर आली. शेवटी तिसऱ्या बालकाच्या कानात घातली. ती बाहेर आलीच नाही. तो वृद्ध गृहस्थ राजाला म्हणाला, "महाराज, या जगात तीन तऱ्हेचे लोक आहेत असा ही बालके संदेश देतात. एक, एका कानाने ऐकून दुसऱ्या कानाने सोडून देणारे, दुसरे ऐकलेले सर्वांना सांगत सुटणारे, आणि तिसरे, ऐकलेले सर्व मनातच ठेवून घेणारे." राजाने त्या वृद्ध गृहस्थाच्या शहाणपणाचे कौतुक करून त्याला मोठे बक्षिस दिले.

या तीन बालकांच्या मूर्तीप्रमाणेच शास्त्रज्ञांचेही तीन वर्ग पडतात. एक, ऐकलेले किंवा पाहिलेले 'चमत्कार' रूढ विज्ञानाच्या नियमात बसत नसल्यामुळे 'खोटे' म्हणून सोडून देणारे, दुसरे, ऐकलेले किंवा पाहिलेले 'चमत्कार' खरे म्हणून स्वीकारले तर आपली शास्त्रज्ञ म्हणून असलेली इत जाईल या भीतीने ते मनातच ठेवून घेणारे; आणि तिसरे, ऐकलेले किंवा पाहिलेले 'चमत्कार' दुसऱ्यांना सांगणारे व त्यांच्या

खरेपणाची शहानिशा करून घेण्यासाठी शास्त्रीय संशोधनाचा जाहीर आग्रह धरणारे. हा ग्रंथ या शेवटच्या शास्त्रज्ञांच्या वर्गाचे प्रतिनिधित्व करतो.

महात्मा गांधींकडे तीन माकडाच्या मूर्ती होत्या हे प्रसिद्धच आहे. एका माकडाने दोन्ही हातांनी आपले कान झाकून घेतले आहेत; दुसऱ्याने आपले दोन्ही डोळे झाकून घेतले आहेत तिसऱ्यांने आपले तोंड झाकून घेतले आहे. वाईट ऐकू नये, वाईट पाहू नये व वाईट बोलू नये, असा संदेश ही माकडे देतात. 'वाईट'च्या जागी 'चमत्कार' गृहीत धरले तर 'चमत्कार' ऐकायचे नाहीत, 'चमत्कार' पाहायचे नाहीत, व 'चमत्कार' सांगायचे नाहीत, हे बीट पाळणाऱ्या हल्लीच्या बहुसंख्य रूढीवादी शास्त्रांचे ही माकडे प्रतिनिधित्व करतात असे म्हणता येईल. हा ग्रंथ अशा शास्त्रज्ञांचा जाहीर निषेध करणाऱ्यांचे प्रतिनिधित्व करतो.

या ग्रंथाची भूमिका शुद्ध विज्ञानवादी आहे. (शुद्ध विज्ञान म्हणजे कुठल्याही तत्त्वज्ञानाची बांधिलकी नसलेले विज्ञान.) शुद्ध विज्ञानात 'देवी' शक्तीला (Divine Power) किंवा परमेश्वराला (Personal God) अजिबात स्थान नाही. सर्व घटना प्राकृतिक आहेत असे शुद्ध विज्ञान मानते व त्यांची नैसर्गिक (natural) उपपत्ती शोधते. पण नैसर्गिक उपपत्ती हे दुधारी शस्त्र आहे. ते जसे अंधश्रद्धेवर प्रहार करते, तसे जडवादी तत्वज्ञानावरही प्रहार करते! आणि हीच जडवादी लोकांची सर्वात मोठी अडचण आहे. काण सर्वच नैसर्गिक घटना जडवादी तत्वज्ञानात बसत नाही ही वस्तुस्थिती आहे. म्हणून ते या शुद्ध विज्ञानरूपी शस्त्राच्या दुसऱ्या 'धारे'कडे नेहमीच व पद्धतशीरपणे दुर्लक्ष करीत असलेले दिसून येतात! ती 'धार' जणू अस्तित्वातच नाही असे ते समजतात नव्हे ते त्यांचे मूलभूत गृहीतकृत्य असून त्या गृहीतकृत्यावरच त्यांचे तथाकथित 'विज्ञान' उभे आहे. या विज्ञानाला आत्मवंचक अर्थात डोळे झाकून दूध पिणाऱ्या मांजराच्या जातीचे व म्हणून 'खोटे विज्ञान' म्हणता येईल. या आत्मवंचक व खोट्या विज्ञानाला उघडे पाडणे, त्याचे खरे स्वरूप वाचकांपुढे ठेवणे हा या ग्रंथाचा मुख्य उद्देश आहे.

आदिकालिक मानव ज्या नैसर्गिक घटनांमागील कार्यकारणभाव त्याला कळत नव्हता, अशा घटनांची 'चमत्कार' म्हणून पूजा करीत होता. (प्लेग, कॉलरा इ. साथीच्या रोगांच्या मरीआईसारख्या देवता अशा 'चमत्कारांच पूजास्थानीय अवशेष आजही

समाजात आहेत.) अजूनही अशा अनेक नैसर्गिक घटना आहेत की ज्यांचा कार्यकारणभाव मानवाला माहीत झालेला नाही. प्रश्न असा आहे की अशा घटनांची आदिकालिक मानवाप्रमाणे 'चमत्कार' म्हणून पूजा करायची का? की त्यांच्या पाठीमाचा कार्यकारणभाव शास्त्रीय निकषाखाली तपासून समजून घेण्याचा प्रयत्न करायचा? की अशा घटना घडतच नाहीत, घडणे शक्य नाही, असे म्हणून शत्रूला पाहून वाळूत डोके खुपसणाऱ्या शहामृगाधी भूमिका स्वीकारायची? दुर्दैवाने काही शास्त्र अशी भूमिका स्वीकारताना दिसून येतात. ही भूमिका आत्मवंचक, अवैज्ञानिक व म्हणून पूर्णपणे त्याज्य होय, हे या ग्रंथात वाचकांच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न केला आहे.

या ग्रंथाच्या मथळ्याविषयी थोडेसे

या ग्रंथातील काही प्रकरणांचा समावेश विज्ञान आणि चमत्कार या पंथातही करता आला असता. पण त्यांचा प्रत्यक्ष संबंध अंधश्रद्धानिर्मूलनवाद्यांशी आल्यामुळे त्यांचा या स्वतंत्र ग्रंथात जो 'विज्ञान, बुद्धिवाद आणि चमत्कार' या बृहद्ग्रंथाचा तिसरा आणि शेवटचा भाग आहे समावेश केला आहे. ही प्रकरणे अंधश्रद्धा निर्मूलनवाद्यांचा अवैज्ञानिकपणा व सत्याला सामोरे जाण्यातील त्यांचा भ्याडपणा उघड करणारी आहेत हे वाचकांच्या लक्षात येईल. या बाबतीत त्यांचे पितळ उघडे पाडणाऱ्या सर्वात महत्त्वाच्या व नेत्रदीपक घटना भानामतीच्या असल्यामुळे त्यापैकी काहींचा समावेश या अंधात केला आहे. अशी प्रकरणे हे लोक शक्य तो टाळतात. पण नाइलाजास्तव अशा प्रकरणांना तोंड देणे त्यांना भाग पडलेच तर तेथे लबाडी व क्लुप्त्या यांचा ते सर्रास वापर करतात असे आढळून येते. भानामतीच्या घटनांच्या सत्यताप्रस्थापनेबरोबरच ही प्रकरणे अशा रीतीने या लोकांची लबाडी व ढोंगीपणाही उघड करतात. म्हणून अशी प्रकरणे येथे घेतली आहेत.

बुद्धी व बुद्धिवाद यात गल्लत करून बुद्धिवादाला विरोध म्हणजे बुद्धीलाच विरोध असा गैरसमज ज्याप्रमाणे काहीजण पसरवतात, त्याप्रमाणे 'चमत्कार' व बुवाबाजी यात गल्लत करून चमत्कारांचे समर्थन म्हणजे बुवाबाज लोकांचे (तथ्याकथित godmen यांचे) व अंधश्रद्धेचे समर्थन असा अपसमज हे लोक पसरवत असतात. अशा बुवाबाज लोकांचे (जे समाजातील अज्ञानाचा गैरफायदा घेत

असतात) समर्थन म्हणजे समाजातील चोरांचे समर्थन होय; आणि ते कोणीही करणार नाही, ही साधी गोष्ट या 'अंनिस' वाल्यांना कळत नाही. तथापि, चमत्कारांच्या नावाखाली काही स्वार्थी म्हणजे मूल लोक समाजाला फसवतात म्हणून चमत्कारच खोटे म्हणणे हे इंग्रजीतील throwing the baby along with the bathwater धुतल्यानंतर त्या पाण्याबरोबर मुलालाही फेकून देणे ही म्हण अंमलात आणणे होय. हाच वेडसरपणा हे लोक करीत असतात, आणि तोही विज्ञानाच्या नावाखाली. हे अत्यंत खेदजनक आहे. म्हणून त्यांच्या या प्रयत्नांचा या ग्रंथात खरपूस समाचार घेतला आहे. या लोकांनी 'अंनिस'- ऐवजी 'बुनिस' (बुवाबाजी - निर्मूलन समिती) या नावाने आपली चळवळ चालवली म्हणजेच देवधर्माऐवजी देवधर्माच्या नावाखाली समाजाची फसवणूक करणाऱ्याविरुद्ध चळवळ केली तर समाजात तिला प्रतिष्ठाही मिळेल, जी आज तिला अजिबात नाही. पण हे त्यांना कळेल तो सुदिन ! पण मग आपला बुद्धिवाद त्यांना टाकून धावा लागेल!

ग्रंथातील १, ४, ९, १० व ११ वगळता सर्व प्रकरणे प्रा. कृष्णा गुरव संपादित 'पैलतीर' (साळोखेनगर, कोल्हापूर) या दिवाळी वार्षिकात लेखरूपाने १९८८ ते १९९१ या काळात प्रसिद्ध झाली आहेत. अद्वयानंद राघोबा गळतगे भोज (बेळगाव).

दि.११ डिसेंबर २०२३रोजी भोज येथे संपन्न झालेल्या तिसऱ्या कन्नड साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद आपण भूषविले आहेत. त्यावेळी सजवलेल्या रथातून पत्नी समावेत जाताना.



